# जीवनात यशस्वी होण्यासाठी ध्येयवेडे बना

## नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात : मौनी विद्यापीठात पदवी प्रदान समारंभ

सकाळ वृत्तसेवा

गारगोटी, ता. ५ : यश केवळ चांगल्या परिस्थितीतच मिळते, असे नसून प्रतिकूल परिस्थितीतही मिळते. आपल्याकडे चिकाटी हा चांगला गुण असतो. जेव्हा दिवस प्रतिकूल असतात तेव्हा प्रयत्नशील राहा. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर ध्येयवेडे बना, असा सल्ला नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांनी दिला.

येथील मौनी विद्यापीठाच्या कर्मवीर हिरे महाविद्यालय व आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या संयुक्त पदवीदान समारंभात ते बोलत होते. विश्वस्त सौ. शालिनी देसाई अध्यक्षस्थानी होत्या. संचालक डॉ. आर. डी. बेलेकर, शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य संजय जाधव प्रमुख उपस्थित होते. मान्यवरांच्या



गारगोटी : मौनी विद्यापीठातील पदवी प्रदान कार्यक्रमात बोलताना नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंतराव थोरात. शेजारी संचालक डॉ. आर. डी. बेलेकर, विश्वस्त शालिनी देसाई, संजय जाधव, प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील आदी. (छायाचित्र : धनाजी आरडे)

हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण झाले.

शालिनी देसाई म्हणाल्या, ''विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर पदवी घेण्याचा आनंद वेगळाच असतो. मौनी विद्यापीठात विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विविध अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.''

संजय जाधव म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम, अभ्यासक्रम राबवले जातात. महाविद्यालय व विद्यापीठाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी प्रगतीकडे वाटचाल करावी.''

प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. आर. डी. बेलेकर यांनी आभार मानले. मौनी विद्यापीठाचे सदस्य विश्वनाथ कुंभार, प्रा. दीपक खोत, सौ. पल्लवी कोरगावकर, विनोद पंडित, डॉ. डॉ. आर. के. शेळके, डॉ. ए. एम. प्रधान, उपप्राचार्य बी. बी. डवंग, डॉ. शरद म्हालकर, प्रबंधक मोहन पोवार, अधिक्षक अरविंद देसाई, बी. आय. पाटील आदी उपस्थित होते. प्रा. प्रतिभा देसाई व प्रा. मृणाल देसाई यांनी सूत्रसंचालन केले.

### माणूस घडविणारे शिक्षण हवे

प्रामाणिकपणा व खरेपणाचा जीवनात त्रास होत असला तरी यावरच आपले यश अवलंबून असते. म्हणून आजचे शिक्षण माणूस घडविणारे शिक्षक असावे. मी आयुष्यभर चांगला भारतीय होईन हे वचन मला जीवनात प्रेरणा देणारे ठरले. आपण जोपर्यंत विविधता स्वीकारत नाही, तोपर्यंत यशस्वी होत नाही.

# विद्यार्थ्यांनी एकापेक्षा जास्त कौशल्य विकसित करावीत : डॉ. उल्हास उढाण

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या काळात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये एकापेक्षा अधिक कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन शिक्षण व सामाजिक विषयाचे अभ्यासक डॉ.उल्हास उढाण यांनी केले.

कौशल्य व उद्योजकता केंद्र शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी 'कौशल्य विकास आणि करिअर' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी डॉ.उढाण यांना निमंत्रित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापन शास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ.एच एम ठकार, कौशल्य विभागाचे समन्वयक डॉ. ए.एम गुरव,ॲड तुषार पाटील, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. उल्हास उढाण म्हणाले की,प्रत्येक व्यक्तींमध्ये विविध प्रकारचे कला-गुण असतात.त्याचा शोध आपणास घेता आला पाहिजे. त्यासाठी शिक्षणाचा अर्थ समजून घ्यायला हवा. दीर्घकाळाच्या प्रयत्नातूनच विविध प्रकारचे शोध लावण्यात शास्त्रज्ञ यशस्वी झाले हा इतिहास समजावून घ्यायला हवा; म्हणून एखाद्या दुसऱ्या प्रयत्नातच मला घवघवीत यश प्राप्त व्हावे, अशी अपेक्षा न ठेवता दीर्घकाळ योग्य प्रयत्न करणे, वेळेचे योग्य नियोजन करणे, शिस्तीचे महत्त्व लक्षात घेणे, ऐकण्याची कला नीटपणे अवगत करणे, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा योग्य तो अन्वयार्थ लावणे, सूक्ष्म निरीक्षण करणे आणि आपल्या मनात येणाऱ्या कल्पनेचा विकास करण्यासाठी कृतिशील व्हायला हवे.

# रसायनशास्त्र विभागात आजपासून राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात शुक्रवारी (ता. ६) आणि शनिवारी (ता. ७) राष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. 'इमरजिंग ट्रेण्डस इन केमिकल अँण्ड मटेरियल सायन्सेस' या विषयावरील परिषदेचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होईल. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथील रसायनशास्त्राचे प्रख्यात प्रा. डॉ. दिलीप दवळे प्रमुख पाहुणे यांचे बीज भाषण होईल. प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती असेल. दोन दिवसांच्या परिषदेत २०० हून अधिक संशोधक सहभागी होतील. यात भारतातील विविध संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञ मान्यवर तज्ज्ञ प्राध्यापक, रसायन शास्त्राशी संबंधित ग्रीन केमिस्ट्री, नॅनो टेक्नॉलॉजी, पर्यावरण शास्त्र, औषध निर्माण शास्त्र, पॉलिमर सायन्स, बायो टेक्नॉलॉजी आदी विषयांवर व्याख्याने, संशोधकांचे शोध निबंध सादर होतील. दरम्यान, रसायनशास्त्र विभागाला ५४ वर्षे पूर्ण झाली असून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पत्रिकांत २००० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित करण्याचा मान विभागाला मिळाला आहे.

# विद्यापीठात आजपासून रसायनशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात दि. ६ व ७ मार्च रोजी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. 'इमरजिंग ट्रेंडस इन केमिकल अँड मटेरियल सायन्सेस' या विषयावरील परिषदेचे उद्‌घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. दिलीप ढवळे हे बीज भाषण करणार आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान, अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. दोन दिवसांच्या परिषदेत २०० हून अधिक संशोधक सहभागी होणार असून विविध विषयांवर व्याख्याने, संशोधकांचे शोधनिबंध सादर होणार आहेत. परिषदेचा समारोप ७ मार्च रोजी दुपारी चार वाजता कुलसचिव डॉ. व्ही. डी. नादवडेकर, उद्योगपती आर. शिंगटे यांच्या उपस्थितीत होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विभाग प्रमुख प्रा. डॉ. जी. एस. गोकावी, परिषदेचे समन्वयक प्रा. डॉ. के. एम. गरडकर यांनी केले आहे.

# बृहत् आराखड्याचे काम सुरू



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या येत्या शैक्षणिक वर्षासाठी स्वीकारण्यात येणाऱ्या प्रस्तावांचा वार्षिक बृहत् आराखडा तयार करण्याचे काम सुरू झाले आहे. त्या अनुषंगाने कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यात कोणत्या ठिकाणी नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम यांची आवश्यकता आहे हे निश्चित करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने शिक्षण क्षेत्रातील व समाजातील विविध घटकांच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा करून व त्यांची मते, माहीती घेऊन पुढील कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यापीठ परिक्षेत्रातील तीन जिल्ह्यांमध्ये बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे.

६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता न्यू कॉलेज येथे कोल्हापूर जिल्ह्याची बैठक होईल. ९ मार्च रोजी सातारा येथील सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड व सांगली जिल्ह्यातील एस. डी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, याठिकाणी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी व इतर सर्व घटकांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

# राजारामबापू पाटील यांच्या योगदानावर उद्या चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटमार्फत 'राजारामबापू पाटील आणि महाराष्ट्रातील सहकार चळवळ' या विषयावर उद्या, शनिवारी राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. विद्यापीठाच्या नीलांबरी सभागृहात सकाळी १०.३० वाजता जेम्स मॅडिसन युनिव्हर्सिटीतील महात्मा गांधी सेंटर फॉर ग्लोबल नॉन-व्हायोलन्सचे संचालक डॉ. टेरी बेटझील यांच्या हस्ते उद्‍घाटन होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. या चर्चासत्रामध्ये 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, ज्येष्ठ पत्रकार डॉ. विजय चोरमारे हे राजारामबापू पाटील यांच्या सहकार क्षेत्रातील योगदानावर मांडणी करणार आहेत, अशी माहिती डॉ. प्रकाश पवार यांनी दिली.

# राष्ट्रीय परिषद आजपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागात ६ व ७ मार्चला राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. 'इमर्जिंग ट्रेंड्स इन केमिकल अँड मटेरियल सायन्सेस' या विषयावरील परिषदेचे उद्‌घाटन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठातील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. दिलीप ढवळे प्रमुख पाहुणे असून, त्यांचे बीज भाषण होणार आहे. प्रा. डॉ. पी. एस. पाटील, अधिष्ठाता विज्ञान व तंत्रज्ञान याच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे.

दोन दिवसांच्या परिषदेत दोनशेहून अधिक संशोधक सहभागी होणार असून, यामध्ये ग्रीन केमिस्ट्री, नॅनो टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र, औषध निर्माणशास्त्र, पॉलिमर सायन्स, बायो टेक्नालॉजी, आदी विषयांवर व्याख्याने, शोधनिबंध सादर होणार आहेत. समारोप ७ मार्चला दुपारी चार वाजता शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

# नवीन महाविद्यालय, विद्याशाखांसाठी आज बैठक

## शिवाजी विद्यापीठ तयार करणार आराखडा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाकडून कार्यक्षेत्रातील नवीन महाविद्यालय, विद्याशाखा आणि अभ्यासक्रमांची आवश्यकता समजून घेऊन वार्षिक बृहत आराखडा तयार केला जाणार आहे. त्यासाठी कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्हानिहाय बैठका घेण्यात येणार आहेत. या बैठकांची सुरुवात आज, शुक्रवारी सकाळी ११ वाजता न्यू कॉलेज येथून होणार आहे.

विद्यापीठाने सन २०१८-१९ ते २०२३-२४ असा पंचवार्षिक बृहत आराखडा तयार केला आहे. याअंतर्गत प्रत्येक वार्षिक आराखडा करण्यासाठी नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रमांची आवश्यकता विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शैक्षणिक संस्था प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी, आदी सर्व घटकांकडून समजून घेतली जाते. त्यानुसार सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील आराखड्यासाठी शुक्रवारपासून बैठका घेण्यात येणार आहे. कोल्हापूरनंतर दि. ९ मार्चला सकाळी १० वाजता कऱ्हाड येथील सद्गुरु गाडगे महाराज महाविद्यालयात, तर दुपारी तीन वाजता उरुण-इस्लामपूर येथील एस. डी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे बैठक होणार आहे. त्यातील मते, प्रस्तावांचा विचार करून आराखडा तयार करून तो मे महिन्याच्या अखेरपर्यंत शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी बुधवारी दिली.



### गेल्या वर्षी चार महाविद्यालये, ३९ अभ्यासक्रमांना मान्यता

गेल्या वर्षी विद्यापीठाने शासनाला सादर केलेल्या प्रस्तावातून चार महाविद्यालये, बी. कॉम. (आयटी), एम. कॉम., बी. कॉम. (व्यवसाय व्यवस्थापन) अशा विविध ३९ अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली. जनता शिक्षण मंडळ (हुपरी), नृसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (वाकरे), सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ (मांजरे), साधना एज्युकेशन (गडहिंग्लज) यांना कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालये मंजूर झाली. पेठवडगाव येथील विजयसिंह यादव कला व वाणिज्य महाविद्यालयाला वाणिज्य, तर देवूड (जि. सातारा) येथील संभाजीराव कदम महाविद्यालयाला विज्ञान विद्याशाखेसाठी मान्यता मिळाली असल्याचे उपकुलसचिव व्ही. एस. सोयम यांनी दिली.

# विद्यार्थ्यांनी जादा कौशल्य विकसित करावेत

## डॉ. उल्हास उढाण : कौशल्य व उद्योजकता केंद्रातर्फे मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : सध्याच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या काळात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःमध्ये एकापेक्षा अधिक कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज आहे, असे मत शिक्षण व सामाजिक विषयाचे अभ्यासक डॉ. उल्हास उढाण यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता केंद्रातर्फे आयोजित कौशल्य विकास आणि करियर मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. एच. एम. ठकार होते. यावेळी कौशल्य विभागाचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, ॲड. तुषार पाटील, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांची यावेळी प्रमुख उपस्थिती असेल.

डॉ. उढाण म्हणाले, ''प्रत्येक व्यक्तींमध्ये विविध प्रकारचे कला-गुण असतात. त्याचा शोध आपणास घेता आला पाहिजे. त्यासाठी शिक्षणाचा अर्थ



समजून घ्यायला हवा. दीर्घ काळाच्या प्रयत्नातूनच विविध प्रकारचे शोध लावण्यात शास्त्रज्ञ यशस्वी झाले हा इतिहास समजावून घ्यायला हवा. म्हणून एखाद्या दुसऱ्या प्रयत्नातच मला घवघवीत यश प्राप्त व्हावे अशी अपेक्षा न ठेवता दीर्घकाळ योग्य प्रयत्न करणे, वेळेचे योग्य नियोजन करणे, शिस्तीचे महत्त्व लक्षात घेणे, ऐकण्याची कला नीटपणे अवगत करणे, आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचा योग्य तो अन्वयार्थ लावणे, सुक्ष्म निरीक्षण करणे आणि आपल्या मनात येणाऱ्या कल्पनेचा विकास करण्यासाठी कृतिशील व्हावे.''